शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
४ क्र. शिक्षण/प्रशा/३/मान्यता/९५/९४/९४.
दिनांक ९/१०/९४
Pim. - Ch. P. 633676

प्रति,
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे
इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा,
यमुनानगर, निगडी,
पुणे-४११०४४.

---

विषय:- सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षात नवीन इंग्रजी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ:- क्रमांक स्हा. एल. एस. १०९४/७७७९/प्रा. शि.-३, शालेय शिक्षण विभाग,
विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक:- २९/१०/१९९४.

१. वरील संदर्भान्वये शासनाने आपल्या संस्थेला इंग्रजी माध्यमात प्राथमिक शाळा सुरू करण्यास ९४-९५ या वर्षापासून परवानगी दिली आहे. या संदर्भात खालील बाबींची त्वरीत पूर्तता करावी व तसा अहवाल या कार्यालयास १५ दिवसात सादर करावा.

२. सदर परवानगी खालील अटी व शर्तींवर अवलंबून आहे. त्यांचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

२.१ सदर संस्था, संस्था अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे. किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

२.३ शाळेत, शासनाने वेळोवेळा विहीत केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद व शासनाने वेळोवेळा विहित केलेल्या वेतनश्रेण्या व भत्त्यांच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

२.४ संस्थेचा आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापक विषयक सुविधा व. शाळा व्यवस्थीत चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेसाठी वेळोवेळा विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केला पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पद्धती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे. व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

२.६ संस्थेने शाळेत वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेत विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा व नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

२.७ संस्थेने शाळेत विद्यार्थ्यांसाठी / कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंद वह्या अद्ययावत आणि विश्वसार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा व. इ. मध्ये शासनाच्या कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळा निर्गमित होणाऱ्या आदेशाचे कार्यपद्धतीचे नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपो-आपच रद्द समजण्यात येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज प्रथम शैक्षणिक अधिकाऱ्याकडे [परवानगी दिलेल्या शै. वर्षात ] करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

तरी याबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-४११०१८.

मुख्याध्यापक
प्रो. ए. सोसायटीचे
मॉडर्न हायस्कूल
यमुनानगर निगडी, पुणे-४४